**पंचमुखी गायत्री मंदिर विसनजीनगर येथे गर्भवती महिलांसाठी व्याख्यान.**

**जळगाव:-**

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रूग्णालय जळगाव येथील स्त्रीरोग व प्रसूतीतंत्र विभागामार्फत अखिल भारतीय गायत्री विश्व परिवार हरिद्वार, जळगाव झोन यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक १७/०१/२०२५ रोजी पंचमुखी गायत्री मंदिर विसनजीनगर, जळगाव येथे गर्भवती महिलांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले स्त्रीरोग व प्रसूतीतंत्र विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. सोनाली फराटे यांनी सुप्रजा निर्मितीच्या दृष्टीने गर्भावस्थेतील मातेचा आहार, विहार (परिचर्या), गर्भाचा वाढ व विकास, गर्भिणीचे मानसिक स्वास्थ्य या विषयावर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील गर्भवती महिला उपस्थित होत्या. आंतरवासिय प्रशिक्षणार्थी कु. जागृती पाटील व कु. स्वाती पांढरे यांनी गर्भावस्थेत उपयुक्त योगासने व प्राणायाम यांचे प्रात्यक्षिक सादर केले. अनेक महिलांनी संवाद साधत आपल्या शंकांचे निरसन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. रेखा शिंदे यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी आयुष संचालक आदरणीय डॉ. रामन घुंगराळेकर सर, प्रभारी अधिष्ठाता डॉ. अभिजित अहिरे सर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच स्त्रीरोग व प्रसूतीतंत्र विभागातील सहयोगी प्राध्यापिका डॉ. स्वाती बळी यांनी सहकार्य केले.

# गर्भवती महिलांसाठी व्याख्यान कार्यक्रमाचे फोटो (दि. १७/०१/२०२५)










